# प्रेसनोट

दि.२५/०१/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | वैजापूर पो.स्टे., औरंगाबाद ग्रामीण गुरनं.२९/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अभिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | रामेश्वर सिताराम काळे, वय–३५ वर्ष, चालक पोलीस कॉन्स्टेबल, वर्ग–३, नेमणुक उपविभागीय पोलीस अधिकारी, वैजापूर यांचे वाहन चालक |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रु.५०,०००/– रुपये तडजोड अंती लाचेची मागणी रु.३०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ––– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे भावाचे नावे नेवरगांव, ता.गंगापूर येथे अधिकृत परवाना असलेले देशी दारुचे दुकान आहे. दुकानाचे सर्व कामकाज तक्रारदार हे पाहतात. दि.१८/१२/२०२२ रोजी यातील आरोपी लोकसेवक रामेश्वर सिताराम काळे, चालक पोलीस कॉन्स्टेबल यांनी तक्रारदार यांची टाटा सुमो गाडी देशी दारुचे १२ बॉक्स घेऊन जात असतांना विरगांव पोलीस स्टेशन हददीत पकडली होती. गाडीमधील दारुचे बॉक्स व गाडी जप्त करुन गाडीमध्ये हजर असलेले दोन इसम व दुकानाचे मालक या नात्याने वरील तक्रारदार यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला होता. नंतर आरोपी लोकसेवक रामेश्वर सिताराम काळे यांनी तक्रारदार यांना फोन करुन वैजापूर येथे बोलावून घेतले व तक्रारदार यांना तुमचे विरुध्द बेकायदेशीररित्या देशी दारु वाहतूक करण्याचा गुन्हा दाखल झाला आहे. तुमचे दुकानाचा परवाना रदद करण्याचा प्रस्ताव उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालया मार्फत पुढे पाठवायचा नसेल तर, तुम्हास रु.५०,०००/– द्यावे लागतील अशी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली. सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.१२/०१/२०२३ रोजी वैजापूर येथे पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांचेकडे रु.५०,०००/– ची मागणी करुन तडजोड अंती रु.३०,०००/– लाचेची मागणी करुन सदर रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणून त्यांचेविरुध्द आज दि.२५/०१/२०२३ रोजी वैजापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा पुढील तपासकामी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर